महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
कृषि संचालक (आत्मा) यांचे कार्यालय
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५

जाक्र/तंत्र /आत्मा/विभागकार्यशाळा/ ३००२८ /२०२३.
कृषि आयुक्तालय, म रा, पुणे. दि :१३.९.२०२३

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक, विभाग (सर्व)

विषय- नैसर्गिक/सेंद्रिय शेती योजना संबंधी विभागस्तरावर कार्यशाळा आयोजित करणेबाबत..........

संदर्भ- या कार्यालयाचे पत्र क्र २८८६६ दि ४/९/२०२३

राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणेसाठी केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना,मोठ्या क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण,राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान तसेच राज्य पुरस्कृत डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजना राबविण्यात येत आहेत .

राज्य शासनाने राज्यामध्ये २५.०० लाख हे. क्षेत्राचे नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरणाबाबत निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने यापुर्वी वेगवेगळ्या योजनांमधुन १२.०७ लाख हे. क्षेत्र नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरण झालेले आहे. उर्वरीत१३.०० लाख हे. क्षेत्र नैसर्गिक/सेंद्रिय शेतीखाली आणावयाचे असल्याने केंद्रव राज्य पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे अत्यंत गरजेचे आहे. दि २७/६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांबाबत माहिती दिलेली असुन डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेचा सविस्तर शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे व दि १०/८/२०२३ रोजी सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

नैसर्गिक/सेंद्रिय शेती योजनांचे अंमलबजावणीसाठी दि. २४ व २५ ऑगस्ट, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर कृषि विभागातील व आत्मा योजनेतील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना कार्यक्षेत्रामध्ये राबविल्या जाणा-या सेंद्रिय शेती योजनांची माहिती करुन देण्याच्या उद्देशाने विभागस्तरावर व जिल्हास्तरावर कार्यशाळा घेऊन योजनेची माहिती संबंधितापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. यासाठी विभागस्तरावर कार्यशाळेचे आयोजन पुढील प्रमाणे करावे.

| अ क्र | विभाग | दिनांक | |
|---|---|---|---|
| १ | कोकण | २०/९/२०२३ | या प्रमाणे स्थळ व वेळ निश्चित करुन या कार्यालयास कळवावे, अपरिहार्य कारणांमुळे यात बदल करावयाचा असल्यास तसे कळवावे |
| २ | नाशिक | २२/९/२०२३ | |
| ३ | पुणे | २६/९/२०२३ | |
| ४ | कोल्हापुर | २९/९/२०२३ | |
| ५ | संभाजीनगर | ४/१०/२०२३ | |
| ६ | लातुर | ६/१०/२०२३ | |
| ७ | अमरावती | १०/१०/२०२३ | |
| ८ | नागपुर | १२/१०/२०२३ | |

CamScanner

कार्यशाळेस आपले अधिनस्त प्रकल्प संचालक व प्रकल्प उपसंचालक (आत्मा), उपविभागीय कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, केंद्र प्रमुख-सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र कृषि विद्यापीठ व प्रमुख शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र यांना निमंत्रित करावे. सदर कार्यशाळेस मा. संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय,पुणे व प्रकल्प संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला हे उपस्थित राहुन मार्गदर्शन करतील.

कार्यशाळेसाठीचा निधी प्रकल्प संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला हे वितरीत करतील. कार्यशाळा विभागातील ज्या जिल्ह्यामध्ये घेतली जाईल त्या जिल्ह्याच्या प्रकल्प संचालक,(आत्मा) यांना निधी वितरीत करण्यात येईल.तुर्तास सदरचा खर्च आत्मा अंतर्गत निधीतुन करावा व राज्यस्तरावरुन निधी प्राप्त झाल्यावर त्याचे समावेशन करावे.

(दशरथ तांभाळे)
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, पुणे

प्रत,

१) प्रकल्प संचालक, डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला
आपण वरील प्रमाणे प्रति जिल्हा देय निधी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष या बाबी अंतर्गत क्षमता संवर्धन/बांधणी या घटकातुन वितरीत करावा.

२) प्रकल्प संचालक (आत्मा) सर्व - उपरोक्त कार्यशाळेस सर्व निमंत्रित उपस्थित राहतील याबाबत आपण आपले स्तरावरुन योग्य ते नियोजन करावे.

CamScanner

**विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक**
**कार्यालय दूरध्वनी क्र. 0253- 2957480/82/83/84**
**E-mail nskjda@gmail.com**

जा.क्र.तंत्र/आत्मा/डॉपदेनैशेमि / 5784 /2023 दि. 21/09/2023

प्रति,

ई-मेल द्वारे

**विभागीय नोडल अधिकारी(स्मार्ट)**
**विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट)**
**अंबड, नाशिक.**

**विषय- डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेंतर्गत विभागस्तरावर कार्यशाळा आयोजित करणेबाबत...**

**संदर्भ- 1) शासन निर्णय क्र.संकीर्ण-2722/प्र.क्र.69/1-ए/, मंत्रालय, मुंबई दि.27/06/2023**
**2) मा.कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, म.राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. पिकेव्हीवाय/कृआ/नैशेमि/कार्य./28866/2023 दि.04/09/2023**
**3) मा.कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, म.राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. तंत्र/आत्मा/विभागकार्यशाळा/30024/2023 दि.13/09/2023**

नैसर्गिक/सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात एकूण 25 लाख हे. क्षेत्र नैसर्गिक/सेंद्रिय शेतीखाली आणावयाचे आहे. राज्यात सद्यस्थितीत 12.07 लाख हे. क्षेत्र नैसर्गिक/सेंद्रिय शेतीखाली आहे. सदर क्षेत्र हे वजा जाता उर्वरित 13.00 लाख हे. क्षेत्र नैसर्गिक/सेंद्रिय शेतीखाली आणावयाचे आहे.

राज्यात डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजनेच्या अंमलबजावणी साठी दि.24 व 25 ऑगस्ट 2023 रोजी नाशिक येथे राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. सदर कार्यशाळेत योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.त्याच धर्तीवर विभाग स्तरावर एकदिवसीय कार्यशाळा **दि.22/09/2023 रोजी** आयोजित करण्याच्या सूचना संदर्भ क्र.2 व 3 अन्वये प्राप्त झाल्या आहेत.

तरी आपणास सूचित करण्यात येते कि, विभागस्तरावरील सेंद्रिय शेतीविषयक कार्यशाळेचे नियोजन आपण प्रकल्प संचालक (आत्मा) नाशिक यांच्या मदतीने आपले स्तरावरून करावे.कार्यशाळेचे स्थळ व वेळ निश्चित करून तात्काळ कळवावे, अपरिहार्य कारणांमुळे संदर्भ क्र.3 नुसार दि.22/09/2023 च्या नियोजित दिनांकात बदल करावयाचा असल्यास तसे आयुक्तालय व विकृसस कार्यालयास तात्काळ कळवावे.

सदर कार्यशाळेत विभागातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा),प्रकल्प उपसंचालक(आत्मा), उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी ,मंडळ कृषि अधिकारी व त्यांचे कार्यालयातील बीटीएम, एटीएम ,कार्यक्षेत्रातील कृषि विद्यापीठांच्या सेंद्रिय शेती संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व कृषि विज्ञान केंद्रातील प्रमुख शास्त्रज्ञ यांना निमंत्रित करावे.

विभागीय कार्यशाळेसाठी येणारा खर्च प्रकल्प संचालक (आत्मा) नाशिक कार्यालय स्तरावरून उपलब्ध निधीतून करावा व राज्यस्तरावरून निधी उपलब्ध झाल्यावर त्याचे समावेशन करावे.केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल वि.कृ.स.सं. कार्यालय व मा.कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**(मोहन वाघ)**
**विभागीय कृषी सहसंचालक**
**नाशिक विभाग, नाशिक**

प्रत-मा.संचालक आत्मा कृषी आयुक्तालय पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

1) प्रकल्प संचालक(आत्मा) नाशिक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव रवाना.

महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
कृषी संचालक (आत्मा) यांचे कार्यालय
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५

जाक्र/कृआ/पिकेव्हीवाय/नै.शे/२४२५ /२०२४.
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांक : १९ जानेवारी, २०२४

प्रति
१. प्रकल्प संचालक, आत्मा
सर्व
२. प्रमुख शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र,
सर्व

विषय- परंपरागत कृषी विकास योजना व डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र /संस्था पातळीवर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे मोड्युलबाबत...

संदर्भ - १. या कार्यालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र/कृआ/पीकेव्हीवाय/मा.सु/२२०७३/२३ दि.०४/०७/२०२३.
२. या कार्यालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र/कृआ/पंदेनैशेमि/मा.सु/२६९२८/२३ दि.१७/०८/२०२३.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. ९५५/२४ दि. ८ जानेवारी, २०२४

उपरोक्त संदर्भ क्र. १, २ व ३ अन्वये परंपरागत कृषी विकास योजना व डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र/संस्था पातळीवर शेतकरी प्रशिक्षणे घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर प्रशिक्षणामध्ये नैसर्गिक/सेंद्रिय शेती विषयक सर्व बाबींचा समावेश होण्यासाठी व प्रशिक्षणात एक सारखेपणा राहणेसाठी प्रशिक्षणाचे मोड्युल तयार करण्यात आलेले आहे. ते सोबत सहपत्रीत केलेले आहे. त्याप्रमाणे सर्व विषयांचा सामावेश करून कृषी विज्ञान केंद्र/संस्थास्तरावर शेतकरी प्रशिक्षणे घ्यावीत.

सोबत - प्रशिक्षण मोड्युल्स

(दशरथ तांभाळे)
कृषी संचालक (आत्मा)
कृषी आयुक्तालय, पुणे

प्रत - १. विभागीय कृषी सहसंचालक, सर्व यांना माहीतीस्तव
२. प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिकशेती मिशन, अकोला यांना कार्यवाहीसाठी

CamScanner